## ग्रामस्तरीय समित्यांनी प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करावे : जिल्हाधिकारी यांचे आवाहन



दि. 23: अवघ्या काही दिवसावर गणेशोत्सव येऊन पोहचला आहे. गावातील बळीराजा चेतना अभियानाच्या ग्रामस्तरीय समित्यांनी शेतक-यांसाठी प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करावे. असे आवाहन जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी समित्यांना केले आहे.

शासनाकडून ग्रामस्तरीय समित्यांना 10 हजार रूपये निधी गावामध्ये सार्वजनिक उत्सव साजरे करण्यासाठी दिलेले आहेत. मात्र, बहुतांष समित्यांनी हा निधी खर्चच केलेला नाही. त्यामुळे आगामी काळात गणेशोत्सव आणि दुर्गोत्सव आदि धार्मीक उत्सव साजरे करण्यात येणार आहे. या उत्सव काळामध्ये ग्रामस्तरीय समित्यांना सुपूर्द केलेल्या निधीमधून शेतक-यांकरिता प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

प्रबोधन कार्यक्रमामध्ये शेतकरी, कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करणे, शेतक-यांना उन्नत व प्रगत शेतीबाबत माहिती देण्यात यावी. कृषी विषयक तसेच शासकिय इतर योजनांची माहिती देण्यात यावी. बळीराजा चेतना अभियान अंतर्गत चालविण्यात येणा-या योजनांची माहिती देण्यात यावी. यामध्ये कर्करोगग्रस्तांना 10 हजारांची मदत, पिकांचे फुटवे खावून विषबाधा झालेल्या मृत जनावरांसाठी मदत यांसह इतर योजनांचे फलक लावून गावात प्रसिध्दी देण्यात यावी. सामाजिक सुरक्षा योजना व अन्न सुरक्षा योजनांची माहिती शेतक-यांना देणे, व्यसनमुक्ती, दारूबंदी, शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, याबाबत कार्यक्रमांचे आयोजन करणे, शेतक-यांत आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होईल असे प्रबोधनात्मक कार्यक्रम घेणे. यामध्ये किर्तन, भजनी मंडळे, व्याख्यान, कलापथक आयोजित करणे. तसेच शेतक-यांचे मनोबल उंचावेल इतर उपक्रम राबविण्यात यावे.

..........................................................................................................................................

### गणेशोत्स मंडळांनाही आवाहन

गावातील मंडळे हे शेतक-यांची वा त्यांच्या पाल्यांचीच असतात. या माध्यमातून शेतक-यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी या मंडळाची भूमिका अतिशय महत्वाची ठरणार आहे. शेतक-यांत जनजागृती निर्माण करण्याकरिता तसेच शेतक-यामध्ये सकारात्मक विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पुढे यावेत. गरीब शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक मदत करणे, तसेच मडळांनी महाप्रसादाच्या कार्यक्रमासाठी थेट शेतकऱ्यांकडून धान्य, भाजीपाला खरेदी करण्याचे आवाहन मंडळांना जिल्हाधिकारी सचिन्द्र प्रताप सिंह यांनी केले आहे.

==============